# गोव्यातील विनयभंगाचे विश्लेषण

•मारुती अवदी

कथित विनयभंग प्रकरणातून निर्माण झालेल्या लोक प्रक्षोभाचा परिणाम म्हणून गोव्याच्या माननीय माजी सभापतींना विधानसभा निवडणुकीत दारुण पराभव पत्करावा लागला आहे. सभापतींसारख्या आदरणीय आणि जबाबदार उच्च पदस्थावर प्रशासकीय सेवेतील एका तरुणीचा विनयभंगाचा आरोप आणि तोही विधानभवनाच्या पवित्र जागेत, ही घटनाच धक्कादायक होती. त्यामुळे गोव्याच्या मुक्तिपूर्व आणि मुक्तिनंतरच्या इतिहासात अभूतपूर्व ठरावे असे एक्केचाळीस दिवसांचे जनआंदोलन घडून आले. विनयभंगासारख्या एका लज्जास्पद घटनेतून हे आंदोलन निर्माण झाल्यामुळे एका अर्थाने ते दुर्दैवी म्हणता येईल, पण भारताच्या नव निर्माणासाठी उचलले गेलेले पहिले पाऊल म्हणून गोव्याचा इतिहास या आंदोलनाची सुवर्णाक्षरांनी नोंद करावी लागेल. या आंदोलनाने गोवा आणि गोमंतकीय लोक यांच्या विषयीच्या अनेक प्रचलित समजुतींना तडा गेलेला आहे. जनमताच्या दबावाखाली सभापतींनी दिलेल्या राजीनाम्याने या आंदोलनाची समाप्ती आणि त्याचक्षणी गोव्याच्या उज्ज्वल भविष्य काळाची नांदीही सुरू झाली आहे.

बाह्य जगातली गोव्याची प्रतिमा अनेक गैरसमजांनी भरलेली आहे. सुवेझ कालव्याच्या पूर्वेस जगात फक्त गोमंतकीय समाज हाच पाश्चिमात्य समाजासारखा बंधमुक्त समाज आहे. (permissive Society) असे लोकांना भासविले जाते. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी गोवा सरकारकडून ज्या सचित्र जाहिराती प्रसिद्ध केल्या जातात, त्यांच्यामुळे हा गैरसमज अधिकच दृढ होतो. त्यामुळे ज्यांना पाश्चात्य देशात जाणे शक्य नाही अशा लोकांच्या झुंडी आपल्या मनातली विषयलालसा पूर्ण करण्यासाठी गोव्यात येतात. पण इथे आल्यावर वस्तुस्थिती वेगळीच असल्याचे त्यांच्या लक्षात येते व त्यांचा अपेक्षाभंग होतो. कथित विनयभंग प्रकरणाविरुद्ध गोमंतकियांनी जी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली त्यामुळे हे गैरसमज कायमचे नाहीसे झालेले आहेत. सर्व गोमंतकीय जनतेने जाती, धर्म आणि पक्ष - पंथ यातील भेद विसरून विनयभंगाविरुद्ध आवाज उठवला त्यामुळे सर्व गोमंतकीयांच्या जीवनात नैतिकतेचे अधिष्ठान सर्वात महत्वाचे आहे हे सिद्ध झाले आहे. तसेच गोव्याच्या नैतिकतेची पाळेमुळे भारतीय संस्कृतीतच खोलवर रुजलेली आहेत हे दिसून आले. गोवा पश्चिमेचे प्रतिबिंब नाही हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे.

कथित विनयभंग प्रकरण विरोधी राजकीय पक्षांनी प्रथम लोकांच्या निदर्शनास आणले. या प्रकरणातून राजकीय फायदा उठविण्याचा विरोधकांचा डाव आहे असा आरोप सत्ताधारी पक्षाने केला. पण गोव्यातील जनतेने या प्रकरणी सर्वच राजकीय पक्षांना फेटाळून लावले. स्वतःला जनतेच्या हिताचे रक्षणकर्ते आणि गोव्याच्या भवितव्याचे शिल्पकार समजणाऱ्या नेत्यांची तर जनतेने अक्षरशः अवहेलना केली. कांही जण म्हणाले की, जनतेने नेत्यांना त्यांची जागा दाखवून दिली. वस्तुस्थितीने दाखविले की भारतातल्या इतर भागातील नेत्यांप्रमाणेच गोव्यातील नेत्यांनाही स्वतःचे असे स्थान नाही, स्वतःची स्वतंत्र प्रतिमा नाही, श्रेष्ठींच्या लहरीवरच ह्या तथाकथित नेत्यांचे भवितव्य अवलंबून असते.

गोमंतकियांची मूल्याधिष्ठित सार्वजनिक जीवनाविषयीची निष्ठा विनयभंग आंदोलनाने दाखविली आहे. जनतेच्या मते कथित विनयभंग प्रकरण आणि कथित विनयभंग करणारी व्यक्ती हे अपवाद नसून आपल्या आजच्या अधोगतीच्या सामाजिक जीवनाची चालती बोलती प्रतीके आहेत. प्रतिष्ठित आणि लब्धप्रतिष्ठित संभावितांचा सुळसुळाट भारताच्या सार्वजनिक जीवनात झालेला आहे. लोकहिताच्या नावाखाली हे संभावित सत्ता आणि संपत्ती बळकावीत आहेत. मदिरा आणि मदिराक्षी हीच या संभावितांची मुख्य ध्येये आहेत. ह्या घडीला भारतात स्त्रियांना केवळ राजकीय क्षेत्रातीलच नव्हे तर प्रशासकीय व्यापारी आणि व्यावसायिक क्षेत्रातील उच्च पदस्थापासूनही रक्षणाची जरुरी आहे. या स्त्रियांच्या छळवादाविषयी जेवढे आपल्या कानावर येते ते म्हणजे समुद्रात बुडालेल्या हिमखंडाच्या जलपृष्ठावर दिसणाऱ्या टोकाएवढे अत्यल्प असते. दुर्दैवाने स्वातंत्र्य मिळवून चार दशके उलटली तरी भारतातील नागरिकांना नोकरी मिळविणे म्हणजे चंद्रावर जाण्याहूनही अवघड वाटते. त्यामुळे नोकरी मिळताक्षणीच नोकरीत कायम होऊ की नाही याची चिंता त्यांना पोखरून टाकते. ज्यांच्या हातात नेमणुकीची आणि कायम करण्याची सूत्रे असतात असे वरिष्ठ-पुरुषांकडून पैशाची आणि स्त्रियांकडून शय्या सोबतीची निर्लज्ज मागणी करतात. मूल्याधिष्ठित सार्वजनिक जीवनासाठी ही परिस्थिती बदलण्याची नितांत गरज आहे. नैतिकता, शील आणि चारित्र्यसंपन्नता ही सुसंस्कृत आणि निकोप समाजाचा आधारस्तंभ असतात. महात्मा गांधी म्हणतात की 'नीतिशून्य राजकारण म्हणजे केवळ गलिच्छताच होय.'

उच्चभ्रू वर्गातील स्त्रिया आणि देशातील स्त्री चळवळीत अग्रभागी असणाऱ्या स्त्रियांनी या विनयभंग प्रकरणाविषयी जी अनास्था दाखविली ती पाहिल्यास कार्ल मार्क्सच्या उद्गारांची आठवण येते. मार्क्सच्या मते धनाधिष्ठित संस्कृतीत बूर्ज्वा स्त्रियांची एवढी नैतिक अधोगती होते की त्यातून त्यांचा उद्धार होणे अशक्यच असते. उच्चभ्रू वर्गातील स्त्रियांविषयी आपण अधिक न बोलणेच बरे. कारण भारतीय संस्कृतीत स्त्री ही अत्यंत वंदनीय आणि पूजनीय मानलेली आहे. स्वामी विवेकानंद सांगत की, भारतीय संस्कृती पुरुषापेक्षा स्त्रीलाच श्रेष्ठ मानते. उच्चवर्गीय स्त्रियांप्रमाणेच उच्चभ्रू विचारवंतही त्यांच्या आदतीप्रमाणे विनयभंग प्रकरणी कुंपणावर बसून राहिले. ज्यावेळी सर्वसामान्य जनता कृतीप्रवण बनून आंदोलनात उतरली होती तेव्हा हे 'आराम खुर्चीतले तत्ववेत्ते' स्वतःच्या संधीसाधू भूमिकेचे बौद्धिक समर्थन करीत होते. स्त्रियांच्या विनयभंगाप्रमाणेच या बुद्धीमंत वर्गाच्या बुद्धीचा विनयभंग हाही आजच्या भारतापुढचा गंभीर प्रश्न आहे.

कथित विनयभंग प्रकरणाने 'कायद्याच्या राज्यातील' (rule of law) ठळक उणिवा प्रकाशात आणल्या. सर्वप्रथम 'विनयभंग' या शब्दाचा कीस काढण्याचा प्रयत्न केला गेला. नंतर न्यायालयीन आणि तात्रिक बाबी यांची उलटसुलट जंत्री केली गेली. कथित विनयभंग प्रकरणी गुंतलेल्या सर्वच व्यक्तींच्या दृष्टीने ही कायदेशीर लटपट गैरसोयीची ठरली. या प्रकरणाच्या मुळाशी असणाऱ्या मुख्य घटनेला जाणिवपूर्वक बगल देण्याचा जेव्हा पद्धतशीर प्रयत्न होऊ लागला तेव्हा लोक गोंधळले. या प्रकरणी कोणत्याही प्रकारची कृती करण्यास सत्ताधारी तयार नाहीत हे लक्षात आल्यावर जनता स्वतःच रस्त्यावर आली आणि कायदा हा पैसेवाल्याकडेच झुकतो या सत्याची प्रचीतीच जणू जनतेने दाखवून दिली. आंदोलन काळात लोकांनी माननीय सभापतींना धक्काबुक्की केल्याच्याही विस्तृत बातम्या येत होत्या. अशा मार्गाने आपला प्रक्षोभ व्यक्त करण्याची गरज लोकांना का भासली? कदाचित सार्वजनिक जीवनाला नीतिमत्तेचे अधिष्ठान प्राप्त करून देण्यास कायदा असमर्थ आहे याची लोकांना जाणीव झालेली असावी. म्हणून कायद्याचे निर्माते, भाष्यकार आणि पालनकर्ते या सर्वांनीच आपली विश्वसनीयता (credibility) सिद्ध करण्याची वेळ आता आलेली आहे.

गोव्यातील वृत्तपत्रांनी या मोक्याच्या प्रसंगी अत्यंत प्रशंसनीय कामगिरी केली. लोकशाहीच्या या चौथ्या प्रमुख घटकाने (fourth Estate) प्रथमच गोव्यात जनकल्याणाच्या कळकळीतून आपले कर्तव्य यथायोग्यरित्या पार पाडले. गोमंतकीय वृत्तपत्रांनी सतत वस्तुस्थितीजन्य माहिती लोकांना पुरवली.

वृत्तपत्रांनी बजावलेल्या या कामगिरीमुळेच गोमंतकीय जनतेला आंदोलनाची दिशा आणि रूपरेषा ठरविता आली. शोध पत्रकारिता हा स्वच्छ सार्वजनिक जीवनाचा एक अत्यावश्यक घटक आहे, हेच यावरून दिसून येते. विद्यार्थी चळवळ ही या आंदोलनातली दुसरी महत्वाची शक्ती. विद्यार्थ्यांनी हस्तक्षेप केला नसता तर राजकीय प्रस्थांच्या अंतर्वर्तुळात या प्रकरणी कांहीच हालचाल झाली नसती ही वस्तुस्थिती कुणीही नाकारू शकणार नाही.

गोव्यातील प्रमुख गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार उघडकीस आणण्याचे सर्वाधिक श्रेय विद्यार्थ्यांकडेच जाते. स्वच्छ सार्वजनिक जीवनाचे 'पहारेकरी' म्हणून आपण काम करू शकतो हे गोमंतकीय विद्यार्थ्यांनी सप्रमाण सिद्ध करून दाखविले आहे. पक्षीय स्वार्थासाठी राजकीय पक्षाकडून अत्यंत धूर्तपणे केले जाणारे विद्यार्थ्यांचे शोषण हा एकच धोका गोमंतकीय विद्यार्थ्यांपुढे आहे. आज भारतातले सर्वच राजकीय पक्ष निवडणुका जिंकण्याचे हुकुमी साधन म्हणूनच विद्यार्थी शक्तीकडे पहातात. जर गोव्यातील वृत्तपत्रे व विद्यार्थी यांनी भ्रष्टाचाराच्या प्रश्नाबद्दल अशीच जागरूकता नेहमी दाखविली तर गोव्यातील सर्व स्तरांतील भ्रष्टाचार उघडकीस येऊन तो नष्ट होणे शक्य आहे.

विनयभंग प्रकरणातील या लोकआंदोलनाचा सर्वात गौरवास्पद पैलू म्हणजे तीन व्यक्तींनी घेतलेला आमरण उपोषणाचा निर्णय. एक पंधरा वर्षांची विद्यार्थिनी, एक एकवीस वर्षांची गृहिणी आणि सत्तर वर्षे वयाचे एक स्वातंत्र्य सैनिक. या तिघांनी सभापतींनी राजीनामा देईपर्यंत आपला आमरण उपोषणाचा निर्धार कायम राखला. आत्मबलिदान हाच सर्वश्रेष्ठ त्याग आहे, आणि केवळ लोककल्याणासाठी ज्या व्यक्ती या बलिदानास तयार झाल्या त्या खरोखरच सर्वात महनीय आहेत. गोमंतकात ह्या त्यागाला सिद्ध झालेल्या व्यक्ती स्वतःला समाजाचे तथाकथित आधारस्तंभ म्हणवून घेणाऱ्यांपैकी नव्हत्या किंवा स्वतःच्या प्रतिष्ठितपणाचे ऊठसूठ प्रदर्शन मांडणाऱ्या समाजधुरिणांपैकीही नव्हत्या. सार्वजनिक जीवनाच्या शुद्धतेसाठी बध्दपरिकर झालेली ती सामान्य माणसे होती. स्वातंत्र्यानंतरच्या चाळीस वर्षांच्या काळात सबंध भारतात अशा प्रकारचे आमरण उपोषण झालेले नाही. खुद्द गोव्यात तर अशा प्रकारचे उपोषण ही अभूतपूर्व घटनाच आहे. स्वतंत्र भारतात गोवा हेच एकमेव असे राज्य आहे की जेथे सार्वजनिक जीवनाच्या शुद्धतेसाठी प्राणांची बाजी लावण्यात आली. या तीन उमद्या माणसांची सर्व भारतीय जनता कायमची ऋणी राहील.

जनतेची प्रत्यक्ष कृती (Direct Action) हे लोकशाहीचे प्राणतत्व आहे. भारताच्या संदर्भात विचार केल्यास आपल्या सार्वजनिक जीवनाला ग्रासणाऱ्या सर्व आजारांवर जनआंदोलन हेच रामबाण औषध आहे. लोकशाहीचे हे मूलभूत तत्व गोमंतकीयांना किती अचूकपणे उमजलेले आहे हेच विनयभंग विरोधी आंदोलनातून सिद्ध झालेले आहे. खऱ्या लोकशाहीत नेत्यांच्या विभूतिपूजेला स्थान नसते. कारण लोकशाहीत कुठलाही आणि कोणताही नेता कधीच अपरिहार्य नसतो. नेतृत्व केंद्रित लोकशाही म्हणजे फसवी लोकशाही होय. मूठभर व्यक्तींनी चालविलेले राज्य यापलीकडे तिला कांही अर्थ असत नाही. नेतृत्वकेंद्रित लोकशाही पद्धतीत मोजक्याच व्यक्तींना विशेषाधिकार आणि विशेष सवलती असतात. असल्या लोकशाहीत मूठभर नेते आणि त्यांचे खुषमस्करे प्रजेच्या शोषणावर चैनी आणि विलासी जीवन जगतात. म्हणूनच सर्वसामान्य जनतेने सार्वजनिक घडामोडीत लक्ष घातले पाहिजे. सर्वसामान्य जनतेने राजकीय, व्यावसायिक, प्रशासकीय, न्याय आणि संरक्षण या सर्व क्षेत्रातील उच्चपदस्थावर कडक लक्ष ठेवले पाहिजे. असे झाले तरच लोकांना खरीखुरी लोकशाही आणि स्वच्छ प्रशासन मिळू शकेल. राजकर्त्यांना जनतेविषयी नैतिक धाक वाटणे हे निकोप लोकशाहीच्या प्रक्रियेच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे.

सार्वजनिक प्रश्न रस्त्यावर येऊन सोडविणे म्हणजे हिंसाचार व अशांतता यांना आमंत्रणच होय असा कांही हितसंबधितांकडून जाणिवपूर्वक प्रचार केला जातो. मुख्यत्वे राज्यकर्त्यांच्या चेंबर्समध्ये आणि केबिन्समध्ये बसून आपली कारस्थाने गुप्तपणे पार पाडणाऱ्या व्यक्तीच हा प्रचार करीत असतात. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की सर्वसामान्य नागरिकाला आणि आम जनतेलाच मूलतः हिंसा व अशांतता या गोष्टींचा अत्यंत तिटकारा असतो. जनता सदैव अशांतता व हिंसा यांचा तीव्र तिरस्कारच करते. खरे म्हणजे जनतेच्या हिताचा द्वेष करणारे व जनतेचे शोषण करणाऱ्यांचे हितसंबंध जोपासणारे 'चिथावणीखोर दलालच' सार्वजनिक जीवनात हिंसाचार व अशांतता माजविण्याचे काम करीत असतात. आजवरच्या अनुभवावरून स्पष्टपणे दिसते की लोकप्रतिनिधीगृहे खऱ्या लोकहिताचा विश्वासघात करतात. एखाद्या प्रश्नासाठी जेव्हा लोक रस्त्यावर येतात तेव्हा तेथे गुप्तता, कुटिल कारस्थाने आणि हातचलाखी यांना अजिबात वाव नसतो. जन आंदोलनात विभिन्न मते व दृष्टिकोन यांचा एकमेकांशी समतोल साधला जातो आणि अशा ठिकाणी घेतले जाणारे निर्णय हे निश्चितच लोकहिताचे असतात. या उलट लोकप्रतिनिधीगृहातून घेतले जाणारे निर्णय तियल्या सूत्रधाराकडून गुप्तपणे घेतलेले असतात आणि पडद्यामागे घेतलेल्या या निर्णयाला मतदानाद्वारे केवळ औपचारिक मान्यता घेतली जाते. मानवी इतिहासाचा हाच निष्कर्ष आहे आणि फ्रेंच राज्यक्रांती हे याचे उत्तम उदाहरण होय. जोपर्यंत ही क्रांती रस्त्यावर होती, लोकांच्या हातात होती तोपर्यंत ती प्रगतिपथावर होती. पण राष्ट्रीय लोकसभेच्या हाती जेव्हा या क्रांतीची सूत्रे गेली तेव्हा ती क्रांती कारस्थानांच्या हातातील खेळणे बनली. ह्या क्रांतीच्या दुर्दैवाचे दशावतार सुरू झाले आणि शेवटी या क्रांतीची परिणती नेपोलियन बोनापार्टच्या उदयात आणि त्यानंतर बूर्बोन घराण्याच्या पुनरागमनात झाली.

लोकांनी कायदा हातात घेऊ नये अशी ताकीद सत्ताधाऱ्यांकडून दिली जाते पण सामान्य जनता कायदा कधीच हातात घेऊ शकत नाही कारण मुख्य प्रश्नाला कुशलतेने डावलण्याची कायदेपंडिताची कला जनतेकडे नसते. जनता हीच जनकल्याण साधू शकणारी अंतिम सत्ता असल्याने नैतिक मूल्यांची अंमलबजावणी करण्याची कामगिरी जनतेने स्वतःच्या हातात घेणे आवश्यकच आहे. म्हणून राज्यकर्त्यांनी केलेल्या सर्व कृत्यांची साधंत माहिती मिळविण्याचा आग्रह जनतेने धरला पाहिजे आणि या माहितीची सत्यासत्यता पडताळून पाहिली पाहिजे. अशा प्रकारच्या जागरुकतेची क्षमता गोमंतकीय जनतेने दाखवून दिलेली आहे. या महान देशासाठी हा छोटासा प्रदेश प्रकाशयुगाचा अग्रदूत बनू शकतो हेही जनतेने सिद्ध केलेले आहे. गोमंतकीय लोक भारताचे पथदर्शक बनू शकतात, त्यांनी हे मनावर घेण्याचाच फक्त प्रश्न आहे.